8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना (मेन रोड)
MEDICAL
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद मान्ने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## ढोल-ताशांच्या गजरात गणरायाचे आगमन; जालना शहर भक्तिमय



## ‘गणपती बाप्पा मोरया’च्या जयघोषाने शहर दुमदुमले



**जालना । प्रतिनिधी**

गणेश चतुर्थीच्या मंगलमय पर्वानिमित्त जालना शहरात सोमवारी गणरायाचे जल्लोषात आगमन झाले. सकाळपासूनच शहरातील विविध भागांमध्ये गणेशमूर्ती घेण्यासाठी भाविकांची आणि गणेश मंडळांच्या कार्यकर्त्यांची लगबग सुरू होती. दुपारनंतर ढोल-ताशांचा गजर, टाळ-मृदंगाचा निनाद आणि ‘गणपती बाप्पा मोरया’च्या जयघोषाने शहरातील रस्ते दुमदुमून गेले. विविध मंडळांनी पारंपरिक तसेच उत्साहपूर्ण वातावरणात मिरवणुका काढत आपल्या मंडळाच्या ठिकाणी गणरायाची प्रतिष्ठापनेसाठी मूर्ती नेली.

छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसर, गांधी चमन, सिंधी बाजार, नूतन वसाहत यासह शहरातील विविध प्रमुख भागांत गणेश मंडळांच्या मिरवणुका दिसून आल्या. काही मंडळांनी ढोल-ताशांच्या पथकांसह तर काहींनी पारंपरिक वाद्यांच्या साथीने गणरायाला मंडळाच्या ठिकाणी नेले. रस्त्याच्या दुतर्फा उभे राहून नागरिकांनी गणरायाचे दर्शन घेतले. अनेक ठिकाणी भाविकांनी फुलांची उधळण करून तसेच आरती करून बाप्पाचे स्वागत केले. गणरायाच्या आगमन सोहळ्यात लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वच वयोगटातील भाविक सहभागी झाले होते. महिलांचीही मोठ्या संख्येने उपस्थिती होती. पारंपरिक पोशाखात सहभागी झालेल्या महिला, हातात भगवे ध्वज घेऊन जयघोष करणारे युवक आणि बाप्पाच्या आगमनाचा आनंद घेणारी बालके यामुळे मिरवणुकांना विशेष रंगत आली. गणेशमूर्तींच्या विविध आकारांनी आणि आकर्षक रूपांनीही नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. काही ठिकाणी उंच आणि गगनचुंबी गणेशमूर्ती मिरवणुकीचे प्रमुख आकर्षण ठरल्या. मोठ्या मूर्तींच्या आगमनावेळी नागरिकांची गर्दी झाली होती. मात्र, त्याचवेळी साधेपणाला प्राधान्य देणाऱ्या गणेश मंडळांनीही पारंपरिक पद्धतीने बाप्पाचे स्वागत करून वेगळा संदेश दिला. गणेशोत्सव म्हणजे केवळ रोषणाई, भव्य सजावट आणि आकर्षक देखावे नव्हे, तर भक्ती, संस्कृती आणि परंपरेचा उत्सव, ही संकल्पना अधोरेखित (पान २ वर)



छायाचित्र - किरण खानापुरे / जावेद तंबोली





## डीजेबाबतच्या न्यायालयीन निर्णयाचे सन्मानपूर्वक पालन व्हावे-आ. खोतकर

### श्री गणेश महासंघाच्या संपर्क कार्यालयाचे महापौर, उपमहापौरांच्या उपस्थितीत उद्घाटन

**जालना - प्रतिनिधी**

सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार प्रशासनाने डीजे मुक्त गणेशोत्सवाबाबत भूमिका घेतली आहे. या अनुषंगाने आगामी काळात परवानगीसाठी प्रशासनाकडे विनंती केली जाईल; मात्र जर परवानगी मिळाली नाही, तर न्यायालय व प्रशासनाच्या निर्णयांचे सर्वांनी सन्मानपूर्वक पालन करावे व सहकार्य करावे, असे आवाहन आ. अर्जुनराव खोतकर यांनी केले आहे.

येथील मामा चौकातील क्रिस्टल बिजनेस सेंटरमध्ये सोमवार दि. १४ सप्टेंबर रोजी श्री गणेश महासंघाच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन आणि श्री ची प्रतिष्ठापना आ. खोतकर यांच्याहस्ते झाली, त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे महापौर वंदना मगरे,



उपमहापौर राजेश राऊत, युवा नेते अक्षय गोरंट्याल, जिल्हा व्यापारी महासंघाचे अध्यक्ष विनीत सहानी, उद्योजक जगदीश अग्रवाल, महापालिकेतील विरोधी पक्ष नेते कमलेश खरे, नगरसेवक दुर्गेश कटोटीवाले, नगरसेवक शिवराज नारियलवाले यांची उपस्थिती होती. यावेळी श्री गणेश महासंघाचे अध्यक्ष श्लोक अग्रवाल, महासचिव भूषण यादव, कार्याध्यक्ष महेश धन्नावत, माजी अध्यक्ष रोहित भुरेवाल, उपाध्यक्ष डॉ. शिवदत्त विजयसेनानी, गौरव बोरा, आनंद बंब, श्रेयस गोयल, युवा उद्योजक अर्जुन पित्ती, मार्गदर्शक बाबा नंद, अमोल बांगड, विजय खताडे यांची उपस्थिती होती. आ. खोतकर पुढे म्हणाले की, कै. शामशेठ साहनी, कै. रूपा पहेलवान खरे, बळीराम यादव ,भैयालाल नंद, किशनसेठ गोरंट्याल आणि आपण स्वतः मिळून सुरू केलेल्या श्री गणेश महासंघाची परंपरा नंद परिवाराने सामाजिक बांधिलकी जपत अतिशय चांगल्या प्रकारे सुरू ठेवली आहे. गणेशोत्सवादरम्यान मंडळांना येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी गणेश महासंघाने पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. अक्षय गोरंट्याल म्हणाले की, गणेशोत्सव काळात गणेश मंडळ आणि जनतेला विजेची (पान २ वर)

**गणेश मंडळांनी गोसन्मान स्वाक्षरी अभियान राबवावे-श्लोक अग्रवाल**

**महासंघाचे अध्यक्ष श्लोक अग्रवाल म्हणाले की, सर्व गणेश मंडळांनी यंदाचा गणेशोत्सव अत्यंत उत्साहात आणि जल्लोषात साजरा करावा; मात्र त्यासोबतच मंडळांनी समाजोपयोगी व विधायक उपक्रमांचे आयोजन करण्यावर भर द्यावा. अनंत चतुर्दशीला (विसर्जन दिनी) महासंघाच्या मामा चौक येथील मुख्य मंचावरून ‘गोसेवा, गोरक्षण आणि गोहत्या बंदी’ या सामाजिक व धार्मिक विषयावर जनजागृती करणारी मुख्य संकल्पना (थीम) राबवली जाणार आहे. गणेश मंडळांनीही गो सन्मान स्वाक्षरी अभियान राबवावे, असे आवाहन त्यांनी केले. बाप्पा हा विघ्नहर्ता असल्याने त्याने सर्वत्र मुबलक पाऊस पाडून दुष्काळाचे संकट दूर करावे, अशी प्रार्थना महासंघाच्यावतीने बाप्पाच्या चरणी करण्यात आली.**

## जालना जिल्ह्यात अवैध वाहतूक व दारूविक्री विरोधात धडक कारवाई

### हायवा वाहन जप्त; आरटीओकडून १.२० लाखांचा दंड

**जालना – प्रतिनिधी**

जिल्ह्यात अवैध गौण खनिज वाहतूक तसेच अवैध दारूविक्रीविरोधात जिल्हा प्रशासनाने धडक कारवाई केली. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मार्गदर्शनाखाली महसूल, प्रादेशिक परिवहन विभाग आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकांनी दि.१२ रोजी ही कारवाई केली. या कारवाईत अवैध गौण खनिज वाहतूक करणारा एक हायवा वाहन जप्त करण्यात आला असून, आरटीओ विभागाने विविध वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर कारवाई करत सुमारे १ लाख २० हजार रुपयांचा दंड वसूल केला. तसेच राज्य उत्पादन शुल्क विभागाने अवैध देशी-विदेशी दारूचा साठा जप्त करून दोन गुन्हे दाखल केले आहेत. महसूल विभागाच्या पथकाने अंबड तालुक्यातील धनगरपिंपरी रस्ता परिसरात अवैध वाळूची वाहतूक करणाऱ्या हायवा ट्रक (क्रमांक एमएच-२०-ईजी-८००१) वर कारवाई केली. सदर वाहनातून गौण खनिजाची अवैध वाहतूक होत असल्याचे आढळून आल्यानंतर वाहन जप्त करून पुढील कारवाईसाठी ताब्यात घेण्यात आले. प्रादेशिक परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांनी अंबड-वडीगोद्री आणि अंबड-धुळे मार्गावर वाहनांची (पान २ वर)

# संपादकीय...

## अधिस्वीकृती समित्या की मोजक्या संघटनांची मक्तेदारी?

पत्रकाराला शासनाची अधिस्वीकृती मिळणे हा केवळ सन्मानाचा विषय नाही; तो पत्रकाराच्या व्यावसायिक अस्तित्वाशी आणि शासन-प्रशासनाच्या अधिकृत संवादातील स्थानाशी जोडलेला महत्त्वाचा अधिकार आहे. त्यामुळे अधिस्वीकृती देणाऱ्या समित्यांची रचना, त्यांचा कार्यकाळ, प्रतिनिधित्वाची पद्धत आणि निर्णयप्रक्रिया ही पारदर्शक, नियमाधारित आणि सर्वसमावेशक असणे अपेक्षित आहे. पण महाराष्ट्रातील राज्य व विभागीय अधिस्वीकृती समित्यांच्या मुदतवाढीवरून निर्माण झालेले प्रश्न या व्यवस्थेच्या पारदर्शकतेवरच गंभीर प्रश्नचिन्ह उभे करतात. ११ जुलै २०२३ रोजी गठित झालेल्या राज्य आणि नऊ विभागीय अधिस्वीकृती समित्यांचा निर्धारित कार्यकाळ १० जुलै २०२६ रोजी संपला. त्यानंतर ४ सप्टेंबरला त्याच समित्यांना आणखी वर्षभराची मुदतवाढ देण्यात आली. येथे सर्वात मूलभूत प्रश्न आहेकार्यकाळ संपल्यानंतर समितीला मुदतवाढ देण्याची स्पष्ट तरतूद कोणत्या नियमात आहे? जर नियमात स्पष्ट अधिकार असेल तर तो शासनाने सार्वजनिकपणे स्पष्ट करावा. आणि जर तशी तरतूद संदिग्ध असेल, तर कायदा व न्याय विभागाचा अभिप्राय घेऊनच पुढे जाणे अधिक योग्य ठरणार नाही का? हा प्रश्न केवळ एका संघटनेचा नाही. तो संपूर्ण पत्रकारिता क्षेत्राच्या विश्वासाचा आहे. प्रेस कौन्सिल ऑफ महाराष्ट्रने शासनाकडे मांडलेली भूमिका याच कारणामुळे महत्त्वाची ठरते. नव्या समित्या गठित करायच्या असतील तर सर्व पात्र आणि क्रियाशील पत्रकार-संपादक संघटनांकडून नव्याने अर्ज मागवा, असे स्पष्ट सांगितले जात आहे. ही मागणी कोणत्याही एका संघटनेच्या बाजूने नसून प्रक्रियेच्या समानतेची आहे. कारण २०२३ नंतर अनेक नव्या संघटना अस्तित्वात आल्या असतील, काही संघटनांनी आपले कार्यक्षेत्र विस्तारले असेल आणि काहींची वैधानिक स्थिती बदलली असेल. मग केवळ जुन्या समित्यांमध्ये प्रतिनिधित्व होते म्हणून त्याच संघटनांना पुन्हा संधी आणि नव्या पात्र संघटनांना मात्र प्रवेशबंदीहा न्याय्य निकष कसा ठरू शकतो?

पूर्वी प्रतिनिधित्व मिळाले म्हणजे कायमस्वरूपी पात्रता मिळाली, असा नियम आहे का? हा प्रश्न शासनाने स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे. संघटनेची खरी ताकद केवळ नावात किंवा पदाधिकाऱ्यांच्या संख्येत नसते. तिची वैधानिक नोंदणी, नूतनीकरण, लेखापरीक्षण, सदस्यसंख्या, आर्थिक पारदर्शकता, कार्यकारिणी, कार्यालयीन व्यवस्था आणि प्रत्यक्ष पत्रकारांसाठी केलेले काम यांची पडताळणी झाली पाहिजे. हे निकष जर योग्य असतील तर ते सर्व संघटनांना समानपणे लागू झाले पाहिजेत. मोजक्या संघटनांच्या प्रतिनिधित्वाला परंपरेचे कवच देऊन नव्या संघटनांना संधी नाकारणे ही प्रतिनिधित्वाची लोकशाही नव्हे.

दुसरा अत्यंत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे अधिस्वीकृती नियमावलीत प्रस्तावित सुधारणा प्रलंबित असल्याचा दावा. जर समित्यांची रचना, प्रतिनिधित्व आणि पात्रता निकष बदलण्याचा विचार शासनाच्या पातळीवर सुरू असेल, तर मग जुन्याच चौकटीत घाईघाईने नव्या समित्या का गठित करायच्या? आधी नियम बदला की आधी समित्या बनवा?

हा साधा प्रश्न आहे; पण त्याचे उत्तर भविष्यातील अनेक वाद टाळू शकते. आज जुन्या नियमांनुसार समित्या गठित केल्या आणि उद्या नियम बदलले, तर पुन्हा प्रतिनिधित्वावरून संघर्ष, हरकती, न्यायालयीन वाद आणि प्रशासकीय पेच निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. शासनाने ही शक्यता आधीच का टाळू नये? याहून गंभीर बाब म्हणजे संबंधित विषय न्यायालयीन प्रक्रियेतही असल्याचा उल्लेख करण्यात आला आहे. अशा परिस्थितीत प्रशासनाने अधिक सावध, कायदेशीरदृष्ट्या भक्कम आणि पारदर्शक भूमिका घेणे अपेक्षित आहे. प्रेस कौन्सिलने यापूर्वीच ९ फेब्रुवारी आणि २१ ऑगस्ट रोजी शासनाचे लक्ष वेधले होते. त्यानंतरही ४ सप्टेंबरला मुदतवाढ देण्यात आली. त्यामुळे आता केवळ निवेदनांची देवाणघेवाण पुरेशी नाही. शासनाने या संपूर्ण प्रक्रियेचे कारण, नियम आणि निर्णयाचा कायदेशीर आधार सार्वजनिक करणे आवश्यक आहे. पत्रकारांच्या अधिस्वीकृतीसाठी समित्या असतील तर त्या समित्यांच्या गठनाची प्रक्रियाच संशयाच्या छायेत राहता कामा नये.

सर्व पात्र संघटनांसाठी अर्ज मागवा. पात्रतेचे निकष आधी जाहीर करा. कागदपत्रांची समान पद्धतीने तपासणी करा. प्राथमिक पात्र यादी प्रसिद्ध करा. हरकती मागवा. आवश्यक असल्यास सुनावणी घ्या. त्यानंतर अंतिम निर्णय घ्या.

इतकी साधी आणि पारदर्शक प्रक्रिया राबविण्यास अडचण काय? पत्रकारितेला पारदर्शकता शिकविणाऱ्या शासनाने पत्रकारांच्या अधिस्वीकृती व्यवस्थेतही पारदर्शकतेचा आदर्श निर्माण केला पाहिजे. राज्य अधिस्वीकृती समितीत दोन प्रतिनिधी आणि नऊ विभागीय समित्यांमध्ये प्रत्येकी एक प्रतिनिधी देण्याची प्रेस कौन्सिलची मागणीही लागू नियमांच्या कसोटीवर तपासली पाहिजे. मागणी कोणाची आहे यापेक्षा पात्रता काय आहे, हा प्रश्न निर्णायक असला पाहिजे.

कारण अधिस्वीकृती समिती ही कोणत्याही संघटनेची मालमत्ता नाही. ती शासनाचीही वैयक्तिक व्यवस्था नाही. ती पत्रकारिता क्षेत्रातील विश्वासाची संस्थात्मक यंत्रणा आहे.

म्हणूनच आता शासनापुढे कसोटी आहेमुदतवाढीचा निर्णय केवळ प्रशासकीय सोय म्हणून कायम ठेवायचा की त्यामागचा कायदेशीर आधार स्पष्ट करायचा? जुन्या प्रतिनिधित्वालाच प्राधान्य द्यायचे की नव्या पात्र संघटनांसाठीही दरवाजे उघडायचे? आणि नियम बदलणार असतील तर बदललेल्या नियमांनुसारच समित्या गठित करायच्या की पुन्हा जुन्याच चौकटीत प्रक्रिया रेटायची? या प्रश्नांची उत्तरे टाळून अधिस्वीकृती व्यवस्थेवरील विश्वास टिकणार नाही.

पत्रकारांच्या अधिस्वीकृतीचा प्रश्न हा पत्रकार विरुद्ध शासन असा संघर्ष नाही; तो नियम विरुद्ध मनमानी, पारदर्शकता विरुद्ध अपारदर्शकता आणि समान संधी विरुद्ध मक्तेदारी यातील निवडीचा प्रश्न आहे. शासनाने आता एकदाच स्पष्ट भूमिका घ्यावीसर्व पात्र संघटनांना समान संधी, समान निकष आणि पारदर्शक प्रक्रिया. कारण अधिस्वीकृती समित्यांमध्ये प्रतिनिधित्व कुणाचे असावे, हा प्रश्न महत्त्वाचा आहेच; पण त्याहून मोठा प्रश्न आहे त्या प्रतिनिधित्वाची निवड कोणत्या नियमाने, कोणत्या निकषाने आणि किती पारदर्शकपणे झाली? याचे उत्तर स्पष्ट असेल, तर समित्यांवर विश्वास राहील. उत्तर संदिग्ध राहिले, तर प्रश्न कायम राहतील.

# सामाजिक ऐक्याचा जागर; सावता महासंघाचा ६ वा वर्धापन दिन जल्लोषात

## संत सावता महाराजांच्या विचारांचा जागर; संघटन, शिक्षण आणि समाजहितासाठी एकत्रित कार्य करण्याचे मान्यवरांचे आवाहन

**सिंधीकाळेगाव - प्रतिनिधी** सामाजिक ऐक्य, संघटन, शिक्षण आणि समाजहिताचा संदेश देणाऱ्या सावता महासंघ महाराष्ट्र राज्याचा ६ वा वर्धापन दिन रविवारी (दि. १३ सप्टेंबर) उत्साहपूर्ण आणि जल्लोषाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. संस्थापक अध्यक्ष संतोष अण्णा डोंगरखोस यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या सोहळ्याला विविध राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व प्रशासकीय क्षेत्रातील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जालना नगरीचे माजी नगराध्यक्ष तथा शिवसेना (शिंदे गट) प्रमुख आणि परभणी जिल्हा संपर्कप्रमुख भास्करराव आंबेकर होते. यावेळी बहुजन वंचित आघाडीचे जिल्हाध्यक्ष रामप्रसाद थोरात, राष्ट्रीय काँग्रेस कमिटीचे जालना शहराध्यक्ष डॉ. विशाल धानुरे, माजी जिल्हा परिषद सभापती देवनाथ जाधव, जिल्हा परिषद सदस्य बबनराव खरात, माजी जिल्हा परिषद सदस्य अशोकराव खलसे, नगरसेवक दिनेश दैने, माळी महासंघाचे सचिव संतोष जमदाडे, समता परिषदेचे अध्यक्ष दीपक भाऊ वैद्य, पंचायत समिती सदस्य सर्जेराव शेवाळे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच महात्मा फुले विचार मंचाचे प्रा. बुलबुले, एकनाथ गायकवाड, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष ज्ञानेश्वर धानुरे, सामाजिक कार्यकर्ते राधाकिसन माने, इंदरराव जाधव, शिक्षक परिषद जिल्हाध्यक्ष मंगेश जवळ, शिक्षक संघ जिल्हाध्यक्ष शांतीलाल गोरे, कास्ट्राईब शिक्षक संघटनेचे जालना जिल्हा सचिव शिवानंद खरात, मा. सरपंच गणेश तिडके, गवळी पोखरीचे मा. सरपंच गणेश वाघमारे, पाथरूडचे सरपंच धनंजय गायके, ॲड. अशोक खरात, मिलिंद काळे, राणी उंचेगावचे सरपंच विठ्ठलराव खैरे, ज्ञानेश्वर वाघमारे सर, बालाजी ठाकरे सर, मस्के सर, मुळे सर, मंडळ अधिकारी खांडेभराड, जनार्धन गिराम, रमेश गिराम यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

पान १ व ४ वरुन...

### ढोल-ताशांच्या....

करत गोवत्स के गणराज गणेश मंडळ, बडी सड़क, जालना यांच्या वतीने गणरायाच्या आगमनाची पारंपरिक मिरवणूक काढण्यात आली. विशेष म्हणजे, सजवलेल्या बैलगाडीत श्री गणपती बाप्पांना विराजमान करून मंडळाच्या स्थळी आणण्यात आले. ढोल-ताशांच्या गजरात आणि 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषात बाप्पांचे आगमन झाले. बैलगाडीतून गणरायाचे आगमन पाहण्यासाठी नागरिकांनी मोठ्या उत्सुकतेने गर्दी केली. आधुनिक तंत्रज्ञान, रोषणाई आणि भव्यतेच्या काळातही पारंपरिक पद्धतीने गणरायाला मंडळाच्या स्थळी आणण्याचा हा उपक्रम लक्षवेधी ठरला.

बैलगाडीला आकर्षक पद्धतीने सजविण्यात आले होते. त्यामध्ये विराजमान असलेल्या गणरायाचे दर्शन घेत भाविकांनी जयघोष केला. पारंपरिक ग्रामीण संस्कृतीशी नाते सांगणाऱ्या या आगमन मिरवणुकीने गणेशोत्सवाच्या सांस्कृतिक मुळांची आठवण करून दिली

गोवत्स गणराज गणेश मंडळाची यंदाची गणेशमूर्तीही विशेष चर्चेचा विषय ठरली आहे. मूर्तीमध्ये कोणत्याही प्रकारचा फॅन्सीपणा किंवा अनावश्यक बदल न करता प्राचीन आणि पारंपरिक स्वरूपातील साधी, सात्त्विक व प्रसन्न मूर्ती मंडळात विराजमान करण्यात आली आहे.

आज गणेशमूर्तींच्या आकारमानापासून त्यांच्या सजावटीपर्यंत मोठी स्पर्धा पाहायला मिळते. काही मंडळांकडून भव्य आणि उंच मूर्तींना प्राधान्य दिले जाते. मात्र, गोवत्स गणराज मंडळाने या स्पर्धेपेक्षा भक्ती आणि परंपरेला महत्त्व देत साध्या स्वरूपातील मूर्तीची निवड केली आहे.

'मूर्ती छोटी, उत्सव मोठा' हे मंडळाचे ब्रीद आहे. गणेशोत्सवाची खरी भव्यता मूर्तीच्या आकारात नसून भक्तांच्या श्रद्धेत, संस्कृतीच्या जपणुकीत आणि समाजाच्या सहभागात आहे, असा संदेश मंडळाच्या भूमिकेतून देण्यात आला आहे. भव्य मूर्ती, आकर्षक रोषणाई आणि मोठ्या सजावटीच्या माध्यमातून उत्सव साजरा करण्याऐवजी साधेपणातूनही गणेशोत्सव तितकाच उत्साहात आणि अर्थपूर्ण पद्धतीने साजरा करता येतो, हे मंडळाने आपल्या उपक्रमातून दाखवून दिले. दरम्यान, गणेश चतुर्थीनिमित्त जालना शहरातील वातावरण सकाळपासूनच उत्साहपूर्ण होते. विविध भागांत गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना करण्यासाठी मंडळांच्या कार्यकर्त्यांची धावपळ सुरू होती. मूर्ती घेऊन जाणाऱ्या वाहनांमुळे तसेच मिरवणुकांमुळे शहरातील प्रमुख रस्त्यांवर गणेशोत्सवाची चाहूल अधिक ठळकपणे जाणवत होती.

छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, गांधी चमन, सिंधी बाजार, नूतन वसाहत आदी परिसरातून विविध गणेश मंडळांनी मिरवणुकीद्वारे गणेशमूर्ती आपल्या मंडळाच्या ठिकाणी नेल्या. काही मिरवणुकांमध्ये पारंपरिक वेशभूषा, भगवे ध्वज, ढोल-ताशा पथके आणि धार्मिक घोषणांनी वातावरण भारून गेले होते. गणरायाच्या आगमनावेळी महिलांनी आरती आणि पूजन करून स्वागत केले, तर युवकांनी ढोल-ताशांच्या तालावर उत्साह व्यक्त केला. बालकांमध्येही गणरायाच्या आगमनाचा विशेष आनंद दिसून आला. जालना शहरातील गणेश आगमन सोहळ्याने यंदा भव्यता आणि पारंपरिकता या दोन्हींचे दर्शन घडवून आणले. एका बाजूला विविध आकारातील आकर्षक आणि गगनचुंबी गणेशमूर्ती नागरिकांचे लक्ष वेधून घेत असताना, दुसरीकडे बैलगाडीतून गणरायाचे आगमन करून गोवत्स गणराज गणेश मंडळाने पारंपरिक संस्कृतीचा जागर केला. गणेशोत्सव हा केवळ उत्सव नसून समाजाला एकत्र आणणारा आणि संस्कृतीशी जोडणारा सण आहे. त्यामुळे उत्सवातील उत्साहासोबतच पर्यावरणपूरकता, सामाजिक बांधिलकी, शिस्त आणि परंपरेचे भान राखण्याचा संदेशही यंदाच्या गणेश आगमनातून देण्यात आला. 'गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया'च्या जयघोषात जालना शहरात गणरायाचे आगमन झाले असून पुढील दहा दिवस शहर भक्ती, उत्साह आणि सांस्कृतिक कार्यक्रमांनी गजबजणार आहे.

### डीजेबाबतच्या...

अडचण आणि अन्य समस्यांचा सामना करावा लागू नये यासाठी महापालिकेने पूर्वतयारी केली आहे. महापौर वंदनाताई मगरे म्हणाल्या की, मिरवणूक मार्ग, श्री विसर्जन कुंडाची पाहणी करण्यात आलेली असून, गणेशोत्सव काळात आवश्यक व्यवस्था करण्यात आली आहे. उपमहापौर राजेश उपमहापौर राजेश राऊत म्हणाले की, आपल्या पारंपरिक वाद्यांच्या माध्यमातून समाजातील घटकांवर योग्य नियंत्रण ठेवून जास्तीत जास्त जनजागृती निर्माण करण्याचे काम केले पाहिजे. कमलेश खरे म्हणाले की, साहनी परिवार आणि स्व. रूपा पैलवान खरे आणि या सर्वांनी मिळून श्री महासंघाची स्थापना केली. या परंपरेला अनेक वर्षांचा इतिहास आहे. विनीत सहानी यांनी गणेशोत्सव काळात होणारी गर्दी विचारात घेता, व्यापाऱ्यांना व्यवसाय करण्यात अडचणी येणार नाहीत, या दृष्टीने पोलिसांनी सुरक्षा बंदोबस्त ठेवावा, अशी अपेक्षा व्यक्त केली.

महासचिव भूषण यादव म्हणाले की, लोकमान्य टिळकांनी समाजात एकता आणि संस्कृती जोपासण्यासाठी सुरू केलेल्या परंपरेला पुढे नेत श्री गणेश महासंघाचे हे कार्य गेल्या ४० वर्षांपासून सातत्याने सुरू आहे. गोमातेला राष्ट्रमाता असा दर्जा मिळवून देण्यासाठी महासंघ पुढाकार घेईल आणि त्या दिशेने विशेष प्रयत्न करेल. कार्याध्यक्ष ॲड. महेश राव म्हणाले की, बडी सडकवर १०० पेक्षा अधिक गणेश मंडळे असतात. देखावा पाहण्यासाठी मोठी गर्दी होते. महिला सुरक्षेच्या दृष्टीने पोलिसांनी विशेष बंदोबस्त ठेवावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

या कार्यक्रमाला गणेश महासंघाचे पदाधिकारी आणि सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन दुर्गेश कटोटीवाले यांनी केले तर शेवटी उपस्थितांचे आभार ॲड. महेश धन्नावत यांनी मानले.

### जालना जिल्ह्यात...

तपासणी केली. या तपासणीत एकूण ११५ वाहनांची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये ओव्हरलोड वाहने, फिटनेस प्रमाणपत्रासंबंधी त्रुटी, विमा प्रमाणपत्र नसणे तसेच रिफ्लेक्टर नसणे अशा विविध वाहतूक नियमांच्या उल्लंघनांची प्रकरणे आढळली. या कारवाईत जागेवर १ लाख २० हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. तसेच प्रलंबित ई-चलानच्या माध्यमातूनही दंडाची वसुली करण्यात आली. राज्य उत्पादन शुल्क विभागाने अंबड तालुक्यात अवैध देशी व विदेशी दारू विक्री तसेच साठवणुकीविरोधात कारवाई केली. या कारवाईत दोन गुन्हे दाखल करण्यात आले असून, एकूण ९ लिटर दारूसाठा जप्त करण्यात आला. जप्त मुद्देमालाची किंमत ७ हजार ०६० रुपये असल्याची नोंद करण्यात आली आहे.

अंबड येथील हॉटेल सावली येथे अवैध ५.७६ लिटर देशी दारू साठ्यावर कारवाई करण्यात आली असून, या प्रकरणी सी. आर. क्रमांक २०२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. तसेच अंबड तालुक्यातील शहागड येथील हॉटेल कुबा येथे ३.२४ लिटर देशी-विदेशी दारूच्या अवैध साठ्यावर कारवाई करून सी.आर. क्रमांक ३३१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. जिल्हा पोलिस दलाकडूनही प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली असून, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता () तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा व अधिनियमातील संबंधित कलमांनुसार प्रतिबंधात्मक कारवाईची नोंद करण्यात आल्याचे जालना जिल्हा प्रशासनाने कळविले आहे.

### परवानगी...

चिंताही त्यांनी व्यक्त केली. त्यामुळे प्रवासादरम्यान वैद्यकीय मदत उपलब्ध राहावी, यासाठी दोन ॲम्ब्युलन्स सोबत ठेवण्यात येणार असल्याचे त्यांच्या वक्तव्यावरून स्पष्ट होते. मुक्कामाच्या ठिकाणी पूर्वनियोजित वेळेपेक्षा लवकर पोहोचण्याची शक्यता असल्याचेही त्यांनी सांगितले. त्यामुळे मार्गातील परिस्थिती, आरोग्याची स्थिती आणि प्रशासनाची भूमिका यानुसार प्रवासाचे नियोजन बदलू शकते. एकीकडे स्वतः मुंबईकडे जाण्याचा निर्धार व्यक्त करत असतानाच जरांगे यांनी मराठा समाजाला मात्र सध्या घाईगडबड न करण्याचे आवाहन केले. मुंबईत योग्य वेळी समाजाला बोलावले जाईल, असे सांगत तोपर्यंत गावागावात सावध आणि सुरक्षित राहण्याचे आवाहन त्यांनी केले.

यामुळे आंदोलनाचा पुढील टप्पा नियंत्रित पद्धतीने राबविण्याचा प्रयत्न असल्याचे दिसून येते. मोठ्या संख्येने आंदोलकांनी तातडीने मुंबईकडे कूच करण्याऐवजी परिस्थिती पाहून टप्प्याटप्प्याने पुढील निर्णय घेण्याची भूमिका त्यांनी घेतली आहे. आपल्या आंदोलनामागे समाजाची प्रतिष्ठा आणि आरक्षणाचा प्रश्न असल्याचे स्पष्ट करत जरांगे यांनी अत्यंत आक्रमक शब्दांत आपला निर्धार व्यक्त केला. ''जीव देण्याची वेळ आली तरी चालेल; पण समाजाची प्रतिष्ठा कमी होऊ देणार नाही,'' असे ते म्हणाले. त्यांच्या या वक्तव्यामुळे आंदोलनाची तीव्रता कायम असल्याचे स्पष्ट झाले आहे. सरकारने परवानगी नाकारल्यानंतरही मागे हटण्याऐवजी नियोजित मार्गाने मुंबईकडे जाण्याची भूमिका त्यांनी घेतल्याने प्रशासनासमोरही कायदा-सुव्यवस्था आणि आंदोलन हाताळण्याचे आव्हान उभे राहण्याची शक्यता आहे.

दरम्यान, गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील नागरिकांना शुभेच्छा देत जरांगे यांनी मराठा समाजाला शांतता, संयम आणि सावधगिरी बाळगण्याचे आवाहन केले. आंदोलनाच्या काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये, तसेच समाजाची प्रतिमा खराब होऊ नये, याची काळजी घेण्याचे संकेत त्यांच्या आवाहनातून मिळाले.

आता सकाळी ११ वाजता मनोज जरांगे प्रत्यक्षात कोणत्या परिस्थितीत मुंबईच्या दिशेने रवाना होतात, प्रशासन त्यांना कुठे आणि कशा पद्धतीने रोखते अथवा मार्ग मोकळा करून देते, तसेच पुढील टप्प्यात मराठा समाजाची भूमिका काय राहते, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

### पंतप्रधान नरेंद्र...

राहुल लोणीकर,सतिष घाटगे,रामेश्वर पाटील भांदरगे, बद्रीनाथ पठाडे, ज्ञानेश्वर शेजुळ,शिवाजी बापु थोटे, विश्वजीत खरात,अनिलराव कोलते, गोविंद ढेंबरे, रमेश भापकर, संध्याताई देठे, जिजाबाई जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी जिल्हा पदाधिकारी व कार्यकर्ता बैठकीत भाजपा पदाधिकाऱ्यांशी संवाद साधतांना दानवे म्हणाले की २०१४ पूर्वीचा भारत व २०२६ च्या नंतरचा भारत या बारा वर्षाच्या काळामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वाखाली विकास कामे झाली असल्यामुळे व २०१४ नंतर ते २०२६ मध्ये भारतातील रस्ते, रेल्वे, शिक्षण हे उत्तम दर्जाचे झाल्यामुळे भारत हा विकासाच्या दृष्टीने फार पुढे गेला आहे, जगामध्ये भारत देश हा ८०% जनतेला मोफत रेशन देणारा हा पहिला देश आहे, जगातील अनेक देशांमध्ये अंतर्गत कलहा चालू आहे परंतु भारत देश हा शंताता प्रिय व लोकशाही माननारा देश आहे. भाजपामध्ये जुने कार्यकर्त्याला विश्वासात घेऊन नवीन कार्यकर्त्याला संधी द्यावी लागेल त्यासाठी आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकामध्ये भाजपाची सत्ता स्थापन करण्यासाठी कार्यकर्त्यांनी सज्ज राहण्याचे आवाहन दानवे यांनी यावेळी व्यक्त केले. यावेळी माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत शेतकऱ्यांची कर्जमाफी केल्याबद्दल भाजपा महायुती सरकारचा अभिनंदनचा ठरावा मांडला व भाजपा महायुती सरकारचे अभिनंदन केले यावेळी लोणीकर म्हणाले की भाजपा युवा मोर्चा व महिला मोर्चा भाजपाचे भविष्य असून २०२४ ला महाराष्ट्रात सरकार महिला मोर्चा व लाडक्या बहिणी मुळे आले असून भाजपा पदाधिकारी यांनी प्रत्येक बुथवर कामे करून बुथ मजबूत करण्याचे आवाहन केले.

यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष आ.नारायण कुचे यांनी राजकीय ठराव मांडला व कुचे म्हणाले की, काँग्रेससह विरोधी पक्ष भाजपाच्या विरोधात खोटे प्रचार करीत आहे देशामध्ये पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी सर्व समाजाला विश्वासात घेऊन सर्व समाजाचा विकास केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी विकास पारदर्शक्ता काय असते हे दाखवून दिले आहे. केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या मंत्रिपदाच्या कार्यकाळामध्ये जालना जिल्ह्यात मेडिकल कॉलेज, आ.सी.टी. कॉलेज, ड्रायपोर्ट, रेल्वे टेशन नवीन इमारत व अनेक रस्त्याचे कामे जालना जिल्ह्यात झाले असून काँग्रेस पक्षांनी महिला विधेयक व इतर विकास कामांना विरोध करून विकास कामात खोडा आणला असल्याचे मत आ. कुचे यांनी व्यक्त केले.

युवाशक्ती व नारी शक्ती संधी आणि विकासित भारताच्या संकल्पनेचा ठराव आ. संतोष पाटील दानवे यांनी मांडला व तो सर्वानुमते मंजूर करण्यात आला असून आगामी निवडणुकीमध्ये युवकांना व महिलांना जास्तीत जास्त संधी देणार असल्याचे आमदार दानवे यांनी मत व्यक्त केले. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा सप्ताह अभियानाचे नियोजन पर मार्गदर्शन भाजप युवा नेते राहुल भैया लोणीकर यांनी मांडले व आगामी १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोंबर या महिन्यात होणाऱ्या प्रशिक्षणासंदर्भात भाजपा जालना महानगर जिल्हा अध्यक्ष भास्करराव दानवे यांनी मार्गदर्शन केले, .. संदर्भात आढावा व पुढील नियोजन संदर्भात माजी आ. कैलास गोरंटयाल यांनी मार्गदर्शन केले या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा सरचिटणीस अनिलराव कोलते यांनी केले व सूत्रसंचालन गोविंद ढेंबरे यांनी केले. यावेळी देविदास कुचे, अवधुत नाना खडके,भाऊसाहेब जाधव, शिवाजीराव बोबडे, अकुंशराव बोबडे, संपत टकले, पदमाकर जऱ्हाड, साहेबराव कानडजे, सुधिर पाटील, संतोष लोखंडे, विजय परिहार,दत्तु पंडीत,शालिकराम मस्के,भगवान मात्रे,बाबासाहेब कोलते, द्वारकाताई मेहत्रे, अश्विनी पवार, गजानन नागवे,संजय आटोळे, शत्रुघ्न कणसे,ज्ञानेश्वर भागिले, मनोज शिंदे, प्रदीप पवार,सौरभ कुलकर्णी, विक्रंम उफाड,विष्णु जाधव,पंजाबराव बोराडे,प्रदीप सांतोनकर,संभाजी वारे,राजु साळवे, सतिष निर्वळ,एकनाथ मोरे,भाऊसाहेब काकडे, शंकर लहामगे, तुकाराम जाधव, हरीश्चंद्र बाबा शिंदे, परीक्षीत शिंदे, भिमराव भुजंग,शेख समीर चांद,दिपक ठाकुर, शोभाबाई देशमुख, कल्याण काळे, रमेश शिंदे,सुप्पडसिंग जगरवाल,बबन सिरसाठ,जितेंद्र पालकर, भाऊसाहेब आरसुळ, बद्रीनारायण जऱ्हाड, तारेबीन चाऊस, बाबासाहेब कऱ्हाळे, खैरे गोरखनाथ, गणेश कोल्हे, श्रीराम नागरे, अशोक देशमुख, उध्दव काळे, सर्जेराव जाधव, भिमराव जावळे,सोपान नाईकवाडे, भरत गारखेडे, संजय गाडेकर, वैजीनाथ भुंजग, दत्ता नागवे, सचिन म्हसलेकर, नंदू शेळके, भरत मात्रे, विठ्ठल राठोड, जयसिंग खोकड, डॉ.राजेंद्र ठोसर,गणेश बावणे,विकास कदम, बाबा उगले, भगवान गिरणारे,गजानन लहाने,मधुकराव मुकूटरराव, दगडूबा गोरे,संजय तौर,किरण गुडेकर,अनिरुध्द झिजुर्डे,सुभाष देव्हडे,प्रकाश टकले, विलास जऱ्हाड, रामचंद्र भोजने,नामदेव गिते, गजानन उफाड,शरद पालवे, विजय परीहार,राजेश म्हस्के,पुरुषोत्तम जोशी, नंदू घोडे यांच्यासह जिल्हा पदाधिकारी व कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.

### मूत्रपिंडाचा खडा...

अयशस्वी उपचाराचा अर्थ निष्काळजीपणा होत नाही, असा दावाही त्यांनी केला.

राज्य आयोगाने मात्र डॉक्टर आणि रुग्णालयाचा बचाव पूर्णपणे फेटाळून लावला. आयोगाने आपल्या निकालात स्पष्ट केले की, शस्त्रक्रिया यशस्वी झाल्याचा कोणताही ठोस पुरावा (उदा. ऑपरेशनच्या नोंदी) सादर करण्यात रुग्णालयाला अपयश आले. तसेच, तज्ज्ञांच्या मतानुसार, केवळ साडेतीन महिन्यांच्या अल्प कालावधीत इतका मोठा खडा पुन्हा तयार होणे शक्य नाही. त्यामुळे, रुग्णालयाचा युक्तिवाद ग्राह्य धरता येणार नाही, असे नमूद करत आयोगाने जिल्हा आयोगाचा निर्णय कायम ठेवला आणि डॉक्टर व रुग्णालयाचे अपील फेटाळून लावले.

या निकालावर प्रतिक्रिया देताना ॲड. महेश एस. धन्नावत म्हणाले, ''हा निकाल म्हणजे रुग्णांच्या हक्कांचा मोठा विजय आहे. अनेकदा डॉक्टर आणि रुग्णालये उपचारांमधील त्रुटी दैवदुर्विलास किंवा सामान्य गुंतागुंत असल्याचे भासवून आपली जबाबदारी झटकतात. मात्र, या निकालाने हे स्पष्ट केले आहे की, केलेल्या उपचाराची यशस्विता सिद्ध करण्याची जबाबदारी डॉक्टर आणि रुग्णालयाची आहे. केवळ प्रमाणित उपचार पद्धती वापरली, असे म्हणून चालणार नाही, तर ती योग्य प्रकारे लागू केली गेली आणि त्याचा अपेक्षित परिणाम झाला, हे पुराव्यानिशी सिद्ध करावे लागेल. यामुळे वैद्यकीय क्षेत्रात अधिक पारदर्शकता आणि उत्तरदायित्व येईल.''

### जातीअंत संघर्ष...

न्यायाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे आणि जातीय भेदभावाच्या घटनांविरोधात तातडीने संघटित हस्तक्षेप करणे, याबाबतही अधिवेशनात चर्चा करण्यात आली.

अधिवेशनात पुढील तीन वर्षांसाठी जातीअंत संघर्ष समिती, जालना जिल्ह्याची समिती गठीत करण्यात आली. निमंत्रक म्हणून अनिल मिसाळ यांची निवड करण्यात आली. समितीच्या सदस्यपदी डॉ. सुनंदा तिडके, कॉ. मधुकर मोकळे, सुशील वाघमारे, भगवान कोळे, बाबासाहेब पाटोळे, वैजनाथ लोंढे, हरिश्चंद्र लोखंडे, गौरव चव्हाण, विलास सोनवणे आणि पोपट मोरे यांची निवड करण्यात आली.

यावेळी रवी भदरगे, दिगंबर मोरे, अशोक साळवे, रेखा काकडे, सुभाष शेजुळ, रितेश घुगे, संदेश शेजुळ आणि संतोष खरात यांच्यासह समितीचे कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

# अष्टविनायक दर्शन

महाराष्ट्रातल्या भाविकांच्या हृदयात अष्टविनायक यात्रेला एक अतिशय पवित्र आणि महत्त्वाचे स्थान आहे. अष्टविनायक म्हणजे गणेशाची आठ स्वयंभू (स्वतःहून प्रकट झालेली) मंदिरे. ही आठही मंदिरे पुण्याच्या आसपासच्या परिसरात विखुरलेली आहेत. अष्टविनायक दर्शन केल्याने मनाला शांतता लाभते आणि जीवनातील सर्व संकटे दूर होतात, अशी भाविकांची गाढ श्रद्धा आहे. या पवित्र अष्टविनायकांबद्दल सविस्तर माहिती जाणून घेऊया.

१. मोरगावचा मयुरेश्वर (पुणे)अष्टविनायक यात्रेची सुरुवात आणि शेवट मोरगावच्या मयुरेश्वर दर्शनाने होतो.

कथा: प्राचीन काळी सिंधू नावाच्या राक्षसाचा संहार करण्यासाठी गणपतीने मोरावर बसून अवतार घेतला, म्हणून याला मयुरेश्वर म्हणतात.

वैशिष्ट्य: हे मंदिर एका भुईकोट किल्ल्यासारखे दिसते. मंदिराच्या चारी बाजूंना उंच बुरुज आहेत. येथील गणेशाची मूर्ती डाव्या सोंडेची असून तिच्या डोळ्यात हिरे चमकतात. मंदिराच्या समोर एक भलामोठा दगडी उंदीर आणि नंदीची मूर्ती आहे.

२. सिद्धटेकचा सिद्धीविनायक (अहिल्यानगर)यात्रेतील दुसरे स्थान म्हणजे कर्जत तालुक्यातील सिद्धटेकचा सिद्धीविनायक. भीमा नदीच्या काठावर हे मंदिर वसलेले आहे.

कथा: भगवान विष्णूंनी मधू आणि कैटभ या राक्षसांशी युद्ध करताना गणपतीची आराधना केली होती. या ठिकाणी विष्णूंना सिद्धी प्राप्त झाली, म्हणून याला सिद्धीविनायक म्हणतात.

वैशिष्ट्य: अष्टविनायकांपैकी ही एकमेव मूर्ती आहे, ज्याची सोंड उजव्या बाजूला आहे. उजव्या सोंडेचे गणपती खूप कडक मानले जातात. या मंदिराला प्रदक्षिणा घालण्यासाठी संपूर्ण डोंगराची फेरी मारावी लागते, ज्याला साधारण १ तास लागतो.

३. पालीचा बल्लाळेश्वर (रायगड)कोकणातील रायगड जिल्ह्यात पाली येथे बल्लाळेश्वर गणपतीचे मंदिर आहे.कथा: बल्लाळ नावाच्या एका लहान आणि परम गणेशभक्ताला त्याच्या वडिलांनी जंगलात बांधून ठेवले होते. बल्लाळच्या भक्तीने प्रसन्न होऊन गणपतीने त्याला दर्शन दिले आणि तो तिथेच स्थिरावला. भक्ताच्या नावावरून ओळखला जाणारा हा एकमेव गणपती आहे.

वैशिष्ट्य: हे मंदिर पूर्वमुखी असून, सूर्योदयाच्या वेळी सूर्याची पहिली किरणे थेट मूर्तीवर पडतात. मंदिराचे बांधकाम दगडी असून ते अतिशय मजबूत आहे.

४. महडचा वरदविनायक (रायगड)पाली गावाच्या जवळच खालापूर तालुक्यात महडचा वरदविनायक विराजमान आहे.

कथा: ऋषी गृत्समद यांच्या भक्तीवर प्रसन्न होऊन गणपतीने त्यांना वर दिला होता, म्हणून याला वरदविनायक म्हणतात. हा गणपती भक्तांच्या सर्व इच्छा (वर) पूर्ण करतो.वैशिष्ट्य: या मंदिराचे वातावरण अतिशय शांत आणि निसर्गरम्य आहे. मंदिराच्या गाभाऱ्यात एक अखंड चालणारा नंदादीप आहे, जो गेल्या अनेक वर्षांपासून सतत जळत आहे. येथील मूर्ती ही एका तलावात सापडली होती ५. थेऊरचा चिंतामणी (पुणे)पुण्याजवळ मुळा-मुठा




नदीच्या संगमावर थेऊरचा चिंतामणी वसलेला आहे. कथा: देवराज इंद्राने आणि गुण नावाच्या राजाने आपली चिंता दूर करण्यासाठी या ठिकाणी गणपतीची उपासना केली होती. मनातील सर्व चिंता दूर करणारा देव म्हणून याला चिंतामणी म्हणतात. वैशिष्ट्य: श्रीमंत माधवराव पेशवे यांचे हे अत्यंत आवडते दैवत होते. त्यांनी आपल्या आयुष्यातील शेवटचे दिवस याच मंदिरात घालवले होते. या मंदिराचा सभामंडप लाकडी असून तो अत्यंत सुंदर आहे. ६. लेण्याद्रीचा गिरिजात्मज (पुणे)जुन्नर शहराजवळ एका डोंगरावरील गुहेत लेण्याद्रीचा गिरिजात्मज स्थित आहे. कथा: माता पार्वतीने (गिरिजा) पुत्र प्राप्तीसाठी या डोंगरावर १२ वर्षे तपश्चर्या केली होती. तिच्या तपाने प्रसन्न होऊन गणपतीने तिचा पुत्र (आत्मज) म्हणून जन्म घेतला. म्हणूनच याचे नाव गिरिजात्मज आहे. वैशिष्ट्य: हे मंदिर बौद्ध गुहांच्या समूहात आहे. मंदिरात जाण्यासाठी सुमारे ३०० पायऱ्या चढाव्या लागतात. येथील मंदिरात एकही खांब नाही आणि मूर्ती स्वतंत्र नसून थेट डोंगराच्या खडकात कोरलेली आहे.७. ओझरचा विघ्नेश्वर (पुणे)जुन्नर तालुक्यातील नारायणगावजवळ कुकडी नदीच्या किनाऱ्यावर ओझरचा विघ्नेश्वर आहे. कथा: विघ्नासूर नावाच्या राक्षसाने देवांना खूप त्रास दिला होता. गणपतीने त्याचा पराभव केला. त्यानंतर राक्षसाने गणपतीला शरण येऊन त्याचे नाव स्वतः सोबत जोडण्याची विनंती केली. म्हणूनच याला विघ्नेश्वर (विघ्न हरणारा) म्हणतात. वैशिष्ट्य: या मंदिराच्या सुरक्षेसाठी चारी बाजूंना दगडी तटबंदी आहे. मंदिराचा कळस सोन्याचा असून त्यावर सुंदर नक्षीकाम केले आहे. मूर्तीच्या कपाळावर आणि डोळ्यात मौल्यवान हिरे आहेत. ८. रांजणगावचा महागणपती (पुणे)पुणे-अहिल्यानगर महामार्गावर रांजणगावचा महागणपती स्थित आहे. कथा: भगवान शंकराने त्रिपुरासूर नावाच्या राक्षसाचा वध करण्यापूर्वी याच महागणपतीची पूजा केली होती. हा गणपती अत्यंत शक्तिशाली मानला जातो. वैशिष्ट्य: हे मंदिर पेशवेकाळात बांधले गेले आहे. असे म्हटले जाते की, या मंदिराच्या तळघरात महागणपतीची मूळ मूर्ती लपलेली आहे, ज्याला २० हात आणि १२ डोळे आहेत. सध्या दर्शनासाठी असणारी मूर्तीही अतिशय भव्य आणि सुंदर आहे. अष्टविनायक यात्रा पूर्ण करण्यासाठी साधारणपणे २ ते ३ दिवस लागतात. ही यात्रा मोरगावपासून सुरू करून, सिद्धटेक, पाली, महड, थेऊर, लेण्याद्री, ओझर, रांजणगाव अशी करत पुन्हा मोरगावला येऊन संपवली जाते. आजकाल रस्त्यांचे जाळे उत्तम असल्याने खाजगी गाडीने किंवा एसटी बसने ही यात्रा सहज करता येते. अष्टविनायक दर्शन म्हणजे केवळ एक धार्मिक पर्यटन नाही, तर तो एक आत्मिक आनंदाचा प्रवास आहे.



महाराष्ट्राची संस्कृती, इतिहास आणि निसर्ग सौंदर्य यांचे दर्शन या यात्रेदरम्यान घडते. धावपळीच्या आयुष्यात मनाला शांतता हवी असेल, तर आयुष्यात एकदा तरी पूर्ण श्रद्धेने अष्टविनायक यात्रा नक्की करावी.

**दिलीप देशपांडे.**
**जामनेर. जिल्हा जळगाव.**
**८९९९५६६९१७**

# पावसा, शेतकऱ्यांचे अश्रू कधी पुसणार?

''पडला तर दुष्काळ, अन पडला तर महापूर...'' निसर्गाच्या याच लहरीपणाच्या चक्रात आज महाराष्ट्राचा बळीराजा अडकला आहे. ज्या पावसाची चातकासारखी वाट पाहून शेतकरी डोळ्यात प्राण आणून आकाशाकडे पाहत असतो, तोच पाऊस कधीकधी त्याच्या डोळ्यांत अखंड अश्रू देऊन जातो. म्हणूनच आज प्रत्येक संवेदनशील मनाला एकच प्रश्न पडतोयपावसा, तू शेतकऱ्यांचे अश्रू कधी पुसणार?

भारत हा कृषिप्रधान देश आहे आणि शेती हा आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. पण दुर्दैवाने, या कण्याला बळ देणारा शेतकरी आज स्वतः अत्यंत हलाखीचे जीवन जगत आहे. पावसाचे आणि शेतकऱ्यांचे नाते हे अत्यंत भावनिक आणि जिव्हाळ्याचे आहे. पाऊस आला की काळ्या आईच्या कुशीत हिरवे कोंब हसू लागतात. पण गेल्या काही वर्षांत हे नाते बदलले आहे. जागतिक तापमानवाढ आणि हवामान बदलामुळे पावसाचे गणित पार बिघडून गेले आहे.

कधी जून-जुलै महिना संपत आला तरी पावसाचा पत्ता नसतो. आणि यंदा तर सप्टेंबर महिना संपत आला तरी पावसाचा पत्ता नाही. पावसाअभावी पेरण्या उलटून जातात, कोवळी पिके करपून जातात. पाण्यासाठी आणि चाऱ्यासाठी जनावरे तडफडतात. आणि जेव्हा पाऊस येतो, तेव्हा तो इतका अक्राळविक्राळ रूप धारण करतो की, अतिवृष्टी आणि महापुराने उभ्या पिकांचे वाटोळे होते. हातातोंडाशी आलेला घास एका रात्रीत वाहून जातो. निसर्गाच्या या दुहेरी मारामुळे शेतकरी पुरता कोलमडून गेला आहे.

शेतकरी शेतात फक्त घाम गाळत नाही, तर आपली स्वप्ने पेरत असतो. बँकेचे कर्ज, सावकाराचे देणे, बियाणे आणि खतांचा खर्च या सगळ्याचा ताळमेळ बसवताना त्याची दमछाक होते. पीक चांगले येईल आणि पोराबाळांचे शिक्षण, मुलीचे लग्न, घराची डागडुजी करता येईल, या आशेवर तो जगत असतो. पण जेव्हा निसर्ग लहरी बनतो, तेव्हा त्याच्या सर्व आशांवर पाणी फेरले जाते. कर्जाचा डोंगर आणि पिकांचे झालेले नुकसान यामुळे हताश होऊन अनेक शेतकरी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलतात.

ही आपल्या समाजासाठी अत्यंत भूषणावह आणि वेदनादायी गोष्ट आहे.

पावसाने केवळ पाणी देणे पुरेसे नाही, तर त्याने वेळेवर आणि योग्य प्रमाणात येणे गरजेचे आहे. पण पाऊस तर निर्जीव आहे, तो मानवाच्या हातात नाही. मग शेतकऱ्यांचे अश्रू पुसणार कोण? केवळ निसर्गाला दोष देऊन चालणार नाही. यासाठी शासनाने आणि समाजानेही पुढे येण्याची गरज आहे. शेतकऱ्यांना योग्य नुकसानभरपाई मिळणे, कर्जमाफी शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देणे, पीक विम्याची प्रक्रिया सुलभ करणे आणि सिंचनाच्या सोयी उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. तसेच वृक्ष लागवड मोठ्या प्रमाणात केली पाहिजे.

सगळ्या जगाचा पोशिंदा असणारा शेतकरी आज स्वतः उपाशी राहण्याची वेळ आली आहे. जोपर्यंत हवामान बदलावर ठोस उपाययोजना होत नाहीत आणि शेतकऱ्याला त्याच्या घामाचे योग्य मूल्य मिळत नाही, तोपर्यंत त्याचे अश्रू पुसले जाणार नाहीत.

हे पावसा, तू निसर्गाचा नियम पाळ, पण थोडी दयाही दाखव. शेतकऱ्याच्या कष्टाचा आदर कर. यंदा तरी असा बरस की त्याच्या शेतात सोन्याचे पीक डोलेल आणि त्याच्या डोळ्यांतील अश्रू पुसले जाऊन तिथे आनंदाचे हास्य फुलेल!

**- बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

# श्री गणेश महासंघाच्या 'श्री'ची खा. संदीपान भूमरेंच्या हस्ते प्रतिष्ठापणा तर आ.अंबादास दानवे यांच्या हस्ते आरती



**छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी**
निराला बाजार येथील श्री गणेश महासंघाच्या मध्यवर्ती कार्यालयात ''श्री'' ची प्रतिष्ठापणा सोमवारी (दि. १४) खासदार संदीपान भुमरे यांच्या हस्ते तर आरती माजी विरोधी पक्ष नेते आमदार अंबादास दानवे यांच्या हस्ते करण्यात आली.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी गणेशोत्सवाच्या सर्व गणेश भक्तांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी बंडू गुरुजी यांनी विधिवत गणरायाची प्रतिष्ठापणा करून पोलिस आयुक्त प्रविण पवार, संस्थापक अध्यक्ष पृथ्वीराज पवार, श्री गणेश महासंघ उत्सव समीती अध्यक्ष हरिभाऊ हिवाळे, कार्याध्यक्ष राजेंद्र दानवे, मनसे जिल्हा उपाध्यक्ष प्रशांत जोशी, यांच्या हस्ते गणरायाची आरती करण्यात आली. या प्रसंगी श्री गणेश महासंघ उत्सव समितीचे माजी अध्यक्ष अभिषेक देशमुख, अनिकेत निल्लावार, कार्याध्यक्ष विशाल दाभाडे, संदिप शेळके, हरीश शिंदे, दिनेश राजेभोसले, प्रमोद ठेंगडे, नंदू लबडे, निनाद खोचे, मोहित त्रिवेदी, शिवाजी जोगदंड, समाधान पाटील, प्रल्हाद घुगे, बंटी चौधरी, सागर निकम, चंदू हिवाळे, ऋषिकेश हिवाळे, अभिषेक हिवाळे, विशाल जाधव, प्रसिद्धी प्रमुख सचिन लिला सुखदेव अंभोरे यांची उपस्थिती होती.

**आज महापुरुषांच्या स्मारकांचे स्वच्छता अभियान**

जिल्हा श्री गणेश महासंघ उत्सव समितीच्या वतीने ''श्री गणेशोत्सव'' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत असून यानिमित्ताने विविध समाजाभिमुख उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या अंतर्गत श्री गणेश भक्तांचा सहभाग वाढावा या उद्देशाने मंगळवारी सकाळी ८ वाजता शहरातील विविध भागात महापुरुष स्मारक स्वच्छता अभियान राबविण्यात येत असून क्रांती चौक येथून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करून महापुरुष स्मारक स्वच्छता अभियानास प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत प्रारंभ होणार आहे. या उपक्रमाची सुरुवात क्रांती चौक येथील छत्रपती शिवाजी महाराज, पैठण गेट येथील लोकमान्य टिळक, स्वातंत्र्य सेनानी गोविंदभाई श्रॉफ, सावरकर चौक येथे स्वातंत्र्यविर सावरकर, संभाजीपेठ येथील क्रांतिसूर्य महात्मा फुले, क्रांतिज्योती सावित्री बाई फुले, मिल कॉर्नर येथील छत्रपती राजर्षी शाहू महाराज, यांच्या स्मारकांची साफ - सफाई करून अभिवादन करण्यात येणार आहे. या अभिनव उपक्रमास सर्व गणेश भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन श्री गणेश महासंघाचे संस्थापक अध्यक्ष पृथ्वीराज पवार, उत्सव समितीचे अध्यक्ष हरिभाऊ हिवाळे यांनी केले आहे.

# बॉम्बे आर्ट सोसायटीला बळ देण्यासाठी व अनियमततेच्या विरोधात 'संकल्प पॅनेल'

बॉम्बे आर्ट सोसायटी या १८८८ साली स्थापन झालेल्या कला संस्थेच्या नवीन कार्यकारिणीसाठी दि. ३ ऑक्टोबर २०२६ रोजी निवडणुक होत आहे. बॉम्बे आर्ट सोसायटीला बळ देण्यासाठी व अनियमततेच्या विरोधात एकत्र येत अनेक सभासदांच्या मागणीनंतर ''संकल्प पॅनेल'' २६ कलमी वचनबध्द कार्यक्रम जाहीर करीत निवडणुकीसाठी उतरले आहे. विद्यमान पदाधिकारी सुमारे १५ वर्षापासून कार्यरत आहेत मात्र गेल्या काही वर्षांपासून या संस्थेने, अनेक स्थित्यंतरे, अडी-अडचणी, चढ-उतार आणि बरेच कांही कटु सत्य अनुभवलेले आहेत. प्रस्थापितांना विरोध करण्यासाठी आणि प्रत्येक सजग कलाकाराच्या कला प्रज्ञेला उर्जा देण्याच्या इराद्याने प्रामाणिक, पारदर्शक विचारांचे संस्कार असलेल्या आजीव सदस्यांनी, संस्थेचे ''पुनरुज्जीवन'' करण्याचा संकल्प यावेळी केलेला आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरील मोठी कला संस्था असलेल्या या संस्थेला पुन्हा उदयास आणून भारतीय संस्कृतीचा ''आयकॉन'' बनवण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याची जिद्द यातून दिसून येत आहे.

२००२ पर्यंत ही संस्था जहांगीर आर्ट गॅलरीच्या एका छोट्याशा खोलीत बंदिस्त होती. आता अध्यक्ष पदासाठी निवडणूक लढविणाऱ्या विजय राऊत यांच्या नेतृत्वाखालील त्यावेळी नविन दमाच्या पॅनेलला यश मिळाल्यानंतर २०१० पर्यंत या पॅनलमधील लोकांनी या संस्थेचा कायापालट करण्याचा प्रयत्न केला होता. म्हाडाने काढून घेतलेला प्लॉट परत आणण्यापासुन ते बांद्रा येथील कलासंकुलाचे काम, लाइफ टाईम ॲवॉर्डसह इतरही महत्त्वाच्या ॲवॉर्डसची संख्या वाढवून सोसायटीच्या वार्षिक कला प्रदर्शनाच्या समारंभाच्या वेळी प्रदान करण्यास सुरुवात केली होती. परंतु २०१० नंतर निवडून आलेल्या लोकांनी २०२६ पर्यंत म्हणजे तब्बल १५ वर्षे या सोसायटीवर कार्यरत राहुनही कांहीही काम केले नाही. १८८८ साली ज्या उद्देशाने ही संस्था स्थापन झालेली होती आणि भारतीय इतिहासात संख्येचे नाव मोठ्या आदराने घेतले जात होते त्या प्रतिष्ठेला १५ वर्षात अधोगतीला पोहोचवले गेले आहे. १३८ वर्षांच्या सार्वजनिक न्यास असलेल्या बॉम्बे आर्ट सोसायटी या कलासंस्थेला बळ देण्यासाठी आणि नवसंजीवनी बहाल करण्यासाठी नवनिर्मितीचा संकल्प जाहीरनामा घेऊन ''संकल्प पॅनेल'' कला आणि कलावंतासाठी ठोस कृती कार्यक्रम घेऊन पुढे आली आहे.

हौशी आणि युवा कलावंतांसाठी नियमित, दर्जेदार कला-प्रकाशने व डिजिटल पोर्टफोलिओ प्रकाशन, कला सर्वसामान्यांपर्यंत नेण्यासाठी इतर शहरात कला-उत्सव आणि शिबिरांचे आयोजन, कला क्षेत्रातील व्यावसायिक, शैक्षणिक व सामाजिक प्रश्नांवर अधिकृत भूमिका आणि प्रसंगी आंदोलन. साहित्य संमेलनाच्या धर्तीवर देश-विदेशात वार्षिक भव्य कला संमेलन आणि परिसंवादाचे आयोजन, कला शिक्षण पद्धतीतील बदलांबाबत सरकार दरबारी पाठपुरावा आणि जागरूकता यासाठी शिक्षण सुधारणा, महिला कलावंतांसाठी स्वतंत्र, विशेष प्रदर्शन आणि हक्काचे व्यासपीठ, ज्ञान-संवाद होण्यासाठी ज्येष्ठ आणि विशेष कलावंतांची प्रात्यक्षिके आणि विचारवंतांची व्याख्याने, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय देवाण-घेवाण होण्याच्या दृष्टीकोनातून देश-विदेशातील आर्ट गॅलरीजसोबत टाय-अप आणि कलाकार निवासी () कार्यक्रम, नैसर्गिक आपत्ती किंवा वैद्यकीय गरजेच्या वेळी गरीब व गरजू कलावंतांना तातडीची आर्थिक मदत व्हावी यासाठी कलावंत कल्याण निधीची स्थापना, कलावंत आणि कला-विद्यार्थ्यांसाठी पुरस्कारांची संख्या आणि शिष्यवृत्तींमध्ये भरीव वाढ, ऑडिट न झालेल्या सर्व वर्षाचे नियमाप्रमाणे ऑडिट करून ते पारदर्शकरित्या सर्वांसमोर ठेवण्यात येइल. अनियमिततेसाठी जबाबदार व्यक्तीवर नियमाप्रमाणे धर्मादाय आयुक्त कार्यालय यांना कारवाई करण्याबाबत व वसुली करण्यासाठी प्रस्तावित करण्यात येईल, ट्रस्टचा सर्व निधी योग्य व विहित मार्गाने जास्तीत जास्त वाढवून त्याचा कला व कलाकारांच्या हितासाठी वापर, प्रगत तंत्रज्ञानावर आधारित व्यासपीठ उपलब्ध करून कला व कलाकारांच्या उत्तम प्रचार आणि प्रसारासाठी सर्वसमावेशक फिजिकल व डिजिटल प्रसिद्धी साहित्य निर्माण केले जाईल, सर्व सभासदांचे पाच वर्षातून एखादे चित्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येईल, बॉम्बे आर्ट सोसायटी आर्ट फेस्टिवल सुरू करण्याची प्रथा निर्माण केली जाईल, चित्रकारास चित्र प्रदर्शन भरविण्यास शासनाकडून अनुदान मिळण्याकरिता प्रयत्न करणार, जेष्ठ दृश्य कलाकारांना शासना मार्फत पेन्शन सुविधा तसेच प्रयोगशील आणि गरजू दृश्य कलाकारांना आर्थिक मदत कशा प्रकारे करता येईल यावर सकारात्मक प्रयत्न आपण करणार, संस्थेचे अद्ययावत ग्रंथालय, कला संग्रहालय, आणि प्रतिथयश कलाकारांसह दुर्मिळ कलाकृतींच्या लिलावाचे काही सेवा-शर्ती-नियम-अटींच्या अधीन राहूनआयोजन करणे,

असा सकारात्मक आणि महत्त्वाकांक्षी उपक्रमांचा प्राधान्याने विचार करीत २६ कलमी कार्यक्रम जाहीर करीत प्रा. विजय राऊत (अध्यक्ष)- अमरावती, डॉ. गजानन सिताराम शेपाळ (सचिव) प. महाराष्ट्र, श्रीमती भावना सोनवणे (खजिनदार) सोलापूर / प. महाराष्ट्र, श्री. विठ्ठलराव बी. लोखंडकर (सदस्य)- मुंबई, प्रा. नंदकिशोर मानकर (सदस्य)- नागपूर, श्री. अश्विन कदम (सदस्य)- पुणे, प्रा. संजय साबळे (सदस्य)- नाशिक, प्रा. दिपक रमेश पाटील (सदस्य) खोपोली / कोकण / खानदेश, डॉ. मिनल राजुरकर (सदस्य)- नवी मुंबई, प्रा. रमेश भोसले (सदस्य)- पुणे यांनी ''अनियमिततेला नियमित करून कायद्याच्या चौकटीत बद्ध करण्यासाठी आवाहन केले आहे.

# मसिआ महिला विंगतर्फे सेमिनार उत्साहात संपन्न!

**वाळूज - प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर, दि. १४/०८/२०२६ : च्या महिला विंगतर्फे ''  '' या विषयावर दिनांक १२/०९/२०२६ रोजी मसिआच्या वाळूज येथील कार्यालयात मार्गदर्शनपर सेमिनारचे आयोजन करण्यात आले. क्षेत्रातील उद्योजकांना () तंत्रज्ञानाची ओळख करून देणे तसेच व्यवसायवृद्धीसाठी त्याचा प्रत्यक्ष उपयोग कसा करता येईल, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. श्री योगेश परदेशी, - यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी अध्यक्ष श्री गजानन देशमुख, महिला विंगच्या संयोजिका पल्लवी दलाल व सह संयोजिका सोनल भोसले यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्ष श्री गजानन देशमुख यांनी सांगितले की, '' ही भविष्यातील गोष्ट नसून आजच्या उद्योगाची गरज बनली आहे. मोठ्या उद्योगांप्रमाणेच आणि महिला उद्योजकांनीही तंत्रज्ञानाचा स्वीकार करून आपल्या व्यवसायाची कार्यक्षमता, बाजारपेठ आणि स्पर्धात्मकता वाढविणे आवश्यक असल्याचे मत अध्यक्ष श्री गजानन देशमुख यांनी यावेळी व्यक्त केले आणि महिला विंग मार्फत असेच उपयुक्त सेमिनार आयोजित केले जातील अशी आशा व्यक्त करून उपस्थित आणि सर्वांनी सेमिनार चा लाभ घ्यावा असे आवाहन केले. आजच्या डिजिटल युगात महिला उद्योजकांनी बदलत्या तंत्रज्ञानासोबत पुढे जाणे अत्यंत आवश्यक आहे. हे केवळ तंत्रज्ञान नसून व्यवसाय अधिक स्मार्ट, वेगवान आणि कार्यक्षम करण्याचे प्रभावी माध्यम आहे. महिला उद्योजकांना च्या माध्यमातून आपल्या व्यवसायात नवीन संधी निर्माण करता याव्यात, या उद्देशाने या सेमिनारचे आयोजन करण्यात आले असे पल्लवी दलाल, संयोजिका महिला विंग यांनी सांगितले.

# परवानगी नाकारली तरी मुंबईकडे जाणारच

## मनोज जरांगेंचा निर्धार कायम

**जालना । प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी उपोषण करणारे मराठा संघर्षयोद्धा मनोज जरांगे यांनी मुंबईकडे जाण्याचा निर्धार पुन्हा एकदा ठामपणे व्यक्त केला आहे. सरकारने मुंबईकडे जाण्यास परवानगी नाकारली असली, तरी सकाळी ११ वाजता ठरलेल्या मार्गाने आपण मुंबईकडे रवाना होणारच, अशी स्पष्ट भूमिका जरांगे यांनी पत्रकार परिषदेत मांडली. त्यामुळे आगामी काळात मराठा आरक्षणाच्या आंदोलनाची दिशा पुन्हा एकदा मुंबईकडे वळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

सरकारने परवानगी नाकारल्यानंतर आपल्या प्रकृतीवरही परिणाम झाला असल्याचे जरांगे यांनी सांगितले. उपचार तसेच पाणी आणि सलाईन बंद केल्यामुळे पुन्हा त्रास सुरू झाल्याचे त्यांनी नमूद केले. ''पोटात आणि पायात आग होत आहे. सलाईन सुरू असताना काही प्रमाणात ऊर्जा मिळते; मात्र सलाईन बंद झाली की पुन्हा प्रचंड थकवा जाणवतो,'' असे त्यांनी सांगितले.

मात्र, प्रकृतीची पर्वा न करता आंदोलनाची भूमिका कायम ठेवण्यामागे समाजाची प्रतिष्ठा हा प्रमुख मुद्दा असल्याचे जरांगे यांनी स्पष्ट केले. ''मराठे शब्द बदलतात, असा संदेश समाजात जाऊ द्यायचा नाही. समाजाची प्रतिष्ठा माझ्यासाठी महत्त्वाची आहे,'' असे ते म्हणाले. मुंबईकडे रवाना होताना आपल्या सोबत मोठा जमाव असणार नाही, असेही जरांगे यांनी स्पष्ट केले. सुरुवातीला आपण स्वतःच मुंबईच्या दिशेने जाणार असून, त्यानंतर परिस्थितीनुसार पुढील निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी सांगितले.

''माझ्यासोबत दोन गाड्या आणि दोन ॲम्ब्युलन्स असतील. पाच-दहा माणसांपेक्षा जास्त कोणी सोबत नसेल. आधी मी एकटाच मुंबईकडे जातो. मला कोण अडवते आणि कोण परवानगी नाकारते, ते पाहतो,'' असे जरांगे यांनी स्पष्ट केले.

त्यांच्या या भूमिकेमुळे आंदोलनाचा पुढील टप्पा तुलनेने वेगळ्या पद्धतीने राबविला जाण्याचे संकेत मिळत आहेत. मोठ्या गर्दीऐवजी सुरुवातीला मर्यादित सहकाऱ्यांसह मार्गक्रमण करण्याची रणनीती आखण्यात आल्याचे त्यांच्या वक्तव्यावरून स्पष्ट होते. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारवर टीका करताना जरांगे यांनी सरकारवर मराठा आंदोलनाला रोखण्यासाठी विविध डावपेच वापरत असल्याचा आरोप केला. सण-उत्सवांचा काळ लक्षात घेऊन मराठा समाजाला अडचणीत आणण्याचा प्रयत्न होत असल्याचा दावा त्यांनी केला. मराठा समाज मोठ्या संख्येने मुंबईत दाखल झाल्यास कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल आणि त्याचा ठपका मराठा समाजावर ठेवला जाईल, असा सरकारचा डाव असल्याचा आरोपही त्यांनी केला.

''देवेंद्र फडणवीस यांच्या तोडीस तोड डाव टाकावा लागतो. आधी रस्त्यातील काटे काढतो, मग रथ पुढे नेतो. वेळप्रसंगी डावपेच बदलावे लागतात आणि निर्णय घ्यावा लागतो,'' असे जरांगे यांनी म्हटले. त्यामुळे आंदोलनाची पुढील दिशा ठरविताना केवळ भावनिक आवाहनांऐवजी परिस्थितीनुसार रणनीती बदलण्याचे संकेतही त्यांनी दिले आहेत. मुंबईकडे जाण्यासाठी पूर्वी निश्चित करण्यात आलेला मार्ग बदलण्यात येणार नसल्याचे जरांगे यांनी स्पष्ट केले. पाटोदा, श्रीगोंदा, हडपसर आणि खोपोली येथे ठरल्याप्रमाणे मुक्काम करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. या मुक्कामाच्या ठिकाणीही अंतरवाली सराटीप्रमाणे व्यासपीठ उभारण्याच्या सूचना कार्यकर्त्यांना देण्यात आल्या आहेत. प्रत्येक मुक्कामाच्या ठिकाणी आंदोलनाची भूमिका आणि आरक्षणाचा मुद्दा समाजासमोर मांडला जाणार असल्याचे संकेत आहेत.

उपोषण कायम सुरू ठेवण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला. मुक्कामाच्या ठिकाणी उभारण्यात येणाऱ्या व्यासपीठावरच आपण मुक्काम करणार असल्याचे त्यांनी सांगितले. दीर्घकाळ सुरू असलेल्या उपोषणामुळे आपल्या प्रकृतीवर परिणाम होत असल्याची कबुली जरांगे यांनी दिली. सलाईन सुरू असताना शरीराला काही प्रमाणात ऊर्जा मिळते; मात्र सलाईन बंद झाल्यानंतर पुन्हा अशक्तपणा आणि थकवा जाणवत असल्याचे त्यांनी सांगितले.

मुंबईपर्यंतचा प्रवास सुमारे पाच ते सहा दिवसांचा असू शकतो. या कालावधीत प्रकृती आणखी खालावण्याची शक्यता असल्याची *(पान २ वर)*

# पंतप्रधान नरेंद्र मोदीजी मुळे जगाच्या नकाशावर भारत देशाचे नाव उज्वल

## - माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे

**जालना - प्रतिनिधी**

भारत देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी मुळे जगाच्या नकाशावर भारत देशाचे नाव उज्वल झाले असल्याचे मत भाजप नेते माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी भाजपा जालना ग्रामीणच्या जिल्हा कार्यकारिणी भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांची




संवाद साधताना व्यक्त केले यावेळी जालना जिल्हा ग्रामीण कार्यकर्त्याची बैठक मुक्तेश्वर लॉन्स,कचेरीरोड,जुना जालना येथे सोमवार दिनांक १४ सप्टेंबर २०२६ रोजी संपन्न झाली. यावेळी व्यासपिठावर माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे, माजी मंत्री आ.बबनराव लोणीकर,भाजपा जिल्हाध्यक्ष आ.नारायण कुचे, आ.संतोष पाटील दानवे, मा.आ.कैलास गोरंटयाल, मा.आ.विलास बापु खरात, भास्करराव पाटील दानवे, *(पान २ वर)*

# भाजपा जालना जिल्हा कार्यालयात श्री गणरायाचे उत्साहात आगमन

**जालना - प्रतिनिधी**



दरवर्षीप्रमाणे याही वर्षी भाजपा जालना जिल्हा कार्यालय येथे श्री गणरायाचे मंगलमय वातावरणात आगमन झाले. यावेळी विधिवत पूजा-अर्चा करून श्री गणेशाची मूर्ती स्थापन करण्यात आली. याप्रसंगी भाजपा जालना ग्रामीण जिल्हाध्यक्ष आ. नारायण कुचे, माजी आमदार कैलास गोरंटयाल आणि जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, तालुकाध्यक्ष संजय डोंगरे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी माजी जिल्हाध्यक्ष रामेश्वर पाटील भांदरगे, देविदास देशमुख, राजेश जोशी, जिल्हा सरचिटणीस सुनील पवार, गोविंद ढेंबरे, शिवप्रकाश चितळकर, नगरसेवक रिमा खरात, कल्याण भदनेकर, विजय कामड, जीवन सले, अजित मानधनी, राजाराम जाधव, सुदर्शन काळे, विकास कदम, शाम उगले, सिद्धार्थ संचेती, सुधाकर शिंदे, निवृत्ती कोकरे यांच्यासह भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी श्री गणरायाची मनोभावे पूजा करून सर्वांच्या सुख-समृद्धी, आरोग्य आणि जालना जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्रार्थना केली.

# अवचितराव टेकाळे यांना पुत्रशोक



**जालना - प्रतिनिधी**

बदनापूर तालुक्यातील हिवरा (दाभाडी) येथील प्रतिष्ठीत नागरीक श्री. अवचितराव रंगनाथराव पा. टेकाळे यांचे चिरंजीव एकनाथ अवचितराव टेकाळे (वय ३९) यांचे रविवार १३ सप्टेंबर रोजी रात्री ११.१५ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, वडील, भाऊ, वहिणी, पत्नी, मुलगा व अन्य नातेवाईक असा मोठा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर सोमवार १४ सप्टेंबर रोजी सकाळी हिवरा (दाभाडी) येथील नवीन गाव स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी आप्तेष्ट, नातेवाईक, पंचक्रोशील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मूत्रपिंडाचा खडा काढण्यात हलगर्जीपणा, डॉक्टर व रुग्णालयाला ग्राहक आयोगाचा दणका

**जालना - प्रतिनिधी**

शस्त्रक्रिया करूनही मूत्रपिंडाचा खडा (किडनी स्टोन) काढण्यात अयशस्वी ठरल्याने आणि उपचारात निष्काळजीपणा केल्याबद्दल दिल्ली राज्य ग्राहक विवाद निवारण आयोगाने एक नामांकित सर्जन आणि रुग्णालयाला जबाबदार धरले आहे. केवळ साडेतीन महिन्यांत १७.२ मि.मी. आकाराचा मोठा खडा पुन्हा तयार होऊ शकतो, हा डॉक्टरचा दावा आयोगाने तज्ज्ञांच्या मतानुसार ''असंभाव्य'' ठरवत फेटाळून लावला. या निकालामुळे वैद्यकीय सेवेतील त्रुटींविरोधात रुग्णांच्या हक्कांना मोठे बळ मिळाले आहे, असे मत नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ॲड. महेश एस. धन्नावत यांनी व्यक्त केले आहे. जिल्हा आयोगाने दिलेला १ लाख रुपये नुकसान भरपाई आणि १५,००० रुपये तक्रार खर्चाचा आदेश राज्य आयोगाने कायम ठेवला, ही बाब रुग्णांसाठी अत्यंत दिलासादायक आहे. या प्रकरणात, तक्रारदार मोहम्मद समीर (रा. गाझियाबाद) विरुद्ध डॉ. रजनीश शर्मा आणि के. के. सर्जिकल अँड मॅटर्निटी हॉस्पिटल (दिल्ली) यांच्यातील अपील क्रमांक एफए/१६६/२०२३ वर न्यायमूर्ती संगीता धिंग्रा सहगल (अध्यक्ष) आणि सदस्य बिमला कुमारी यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली. एप्रिल २०१६ मध्ये समीर यांना उजव्या मूत्रवाहिनीत खडा असल्याचे निदान झाले होते. शासकीय रुग्णालयात उपचारासाठी विलंब होत असल्याने त्यांनी डॉ. शर्मा यांच्या रुग्णालयात धाव घेतली. तेथे शस्त्रक्रियेसाठी त्यांच्याकडून ३२,००० रुपये घेण्यात आले. ११ जुलै २०१६ रोजी त्यांच्यावर पहिली शस्त्रक्रिया करण्यात आली, ज्यात ओपन सर्जरीऐवजी डीजे स्टेंटिंगचा वापर करण्यात आला आणि खडा काढल्याचे सांगण्यात आले.मात्र, तक्रारदाराला कोणताही आराम मिळाला नाही. वेदना कायम राहिल्याने ऑगस्ट २०१६ मध्ये त्यांना पुन्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आणि खडा मोठा असल्याचे कारण देत दुसरी शस्त्रक्रिया करण्यात आली. यानंतरही प्रकृतीत सुधारणा न झाल्याने समीर यांनी दुसऱ्या डॉक्टरांचा सल्ला घेतला. नवीन तपासणीत धक्कादायक बाब समोर आली की, त्यांच्या मूत्रपिंडातील खडा काढलाच गेला नव्हता, उलट त्याचा आकार आणखी वाढला होता. ही बाब घेऊन ते पुन्हा डॉ. शर्मा यांच्याकडे गेले असता, पूर्वीची शस्त्रक्रिया यशस्वी झाली होती आणि हा नवीन खडा तयार झाला आहे, असे सांगत पुढील उपचारासाठी पुन्हा पैशांची मागणी करण्यात आली. या अन्यायाविरोधात समीर यांनी जिल्हा ग्राहक आयोगात वैद्यकीय निष्काळजीपणा आणि सेवेतील त्रुटीबद्दल तक्रार दाखल केली. जिल्हा आयोगाने सर्व पुरावे आणि युक्तिवाद ऐकून घेत तक्रारदाराच्या बाजूने निकाल दिला आणि रुग्णालयाला नुकसान भरपाई देण्याचे आदेश दिले. या आदेशाला डॉ. शर्मा आणि रुग्णालयाने राज्य आयोगात आव्हान दिले. त्यांचा युक्तिवाद होता की, त्यांनी केलेले उपचार हे वैद्यकीय मानकांनुसार होते आणि मूत्रपिंडात खडा पुन्हा तयार होणे ही एक सामान्य बाब आहे. *(पान २ वर)*

# केळणा नदीकाठावर देशी दारूची चोरटी विक्री; ४६ बाटल्या जप्त..




**भोकरदन - प्रतिनिधी**

केळणा नदीच्या काठावरील मोकळ्या जागेत चढ्या भावाने देशी दारूची चोरटी विक्री करणाऱ्या मनोज कैलास पोहरकर (३५, रा. पोस्ट ऑफिस, भोकरदन) याच्यावर भोकरदन पोलिसांनी कारवाई केली. रविवारी (१३ सप्टेंबर) सायंकाळी ६.२० वाजता केलेल्या कारवाईत ४,६०० रुपये किमतीच्या देशी दारूच्या ४६ बाटल्या जप्त करण्यात आल्या.याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल प्रदीप टेकाळे यांच्या फिर्यादीवरून गुन्हा क्र. ४९३/२०२६, कलम ६५(ई) महाराष्ट्र दारूबंदी कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस नाईक उबाळे करीत आहेत.

# जातीअंत संघर्ष समिती जालना जिल्ह्याचे दुसरे अधिवेशन संपन्न

## निमंत्रकपदी अनिल मिसाळ यांची निवड; जातीय भेदभावाविरोधातील लढा तीव्र करण्याचा निर्धार

**जालना - प्रतिनिधी**



जातीअंत संघर्ष समिती, जालना जिल्ह्याचे दुसरे जिल्हास्तरीय अधिवेशन दि.१३ सप्टेंबर २०२६ रोजी, भवन, संजय नगर, जालना येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. या अधिवेशनात पुढील तीन वर्षांसाठी समिती गठीत करण्यात आली असून निमंत्रकपदी अनिल मिसाळ यांची निवड करण्यात आली.

अधिवेशनाचे उद्घाटन माकपचे जिल्हा सेक्रेटरी कॉ. मारुती खंदारे यांनी केले. प्रमुख मार्गदर्शक म्हणून जातीअंत संघर्ष समितीचे राज्य समन्वयक कॉ. शैलेंद्र कांबळे उपस्थित होते. यावेळी ज्येष्ठ कामगार नेते कॉ. मधुकर मोकळे तसेच डॉ. सुनंदा तिडके यांची प्रमुख उपस्थिती होती.

**गोरगरीबांच्या जमिनी भांडवलदारांच्या घशात घालण्याचे धोरण : कॉ. मारुती खंदारे**

उद्घाटनपर भाषणात कॉ. मारुती खंदारे यांनी केंद्र व राज्य सरकारच्या दलित-आदिवासी आणि गरीबविरोधी धोरणांवर टीका केली. गोरगरीब कष्टकरी अनेक वर्षांपासून कसत असलेल्या गायरान जमिनी अतिक्रमणाच्या नावाखाली त्यांच्याकडून काढून घेण्याचे प्रयत्न होत असून, दुसरीकडे या जमिनी भांडवलदारांच्या हितासाठी वापरण्याचे धोरण राबविले जात असल्याचा आरोप त्यांनी केला.

दलित, आदिवासी आणि अल्पसंख्याक समाजघटकांनी एकजूट होऊन भांडवली आक्रमणाचा मुकाबला करणे गरजेचे आहे, असे आवाहन कॉ. खंदारे यांनी केले.

**उपवर्गीकरणाच्या माध्यमातून समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न : कॉ. शैलेंद्र कांबळे**

प्रमुख मार्गदर्शन करताना जातीअंत संघर्ष समितीचे राज्य समन्वयक कॉ. शैलेंद्र कांबळे यांनी समाज कल्याण विभागाच्या निधीच्या वापराबाबत प्रश्न उपस्थित केले. मागासवर्गीयांच्या विकासासाठी आणि त्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी असलेला निधी अपेक्षित पद्धतीने खर्च न करता तो इतरत्र वळविला जात असल्यामुळे मागासवर्गीय समाजाला त्यांच्या हक्कांपासून वंचित ठेवले जात असल्याचे त्यांनी सांगितले. मागासवर्गीयांच्या मूलभूत प्रश्नांपासून लक्ष विचलित करण्यासाठी उपवर्गीकरणाच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांमध्ये वाद निर्माण करण्याचे प्रयत्न केले जात आहेत, असा आरोप कांबळे यांनी केला.

जातीअंत संघर्ष समितीची भूमिका स्पष्ट असून समाजातील सलोखा, सामाजिक ऐक्य आणि बंधुभाव कायम राहिला पाहिजे, यासाठी समिती राज्यभर काम करत आहे. जातीय तेढ निर्माण करणाऱ्या प्रवृत्तींना विरोध करून सामाजिक समतेसाठी व्यापक संघर्ष उभारण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

अधिवेशनात मागासवर्गीय विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या वसतिगृहांच्या प्रश्नावर लढा तीव्र करण्याचा ठराव करण्यात आला. तसेच जातीय भेदभावाच्या विरोधात संघर्ष अधिक तीव्र करणे, खासगी क्षेत्रात आरक्षण लागू करणे आणि मागासवर्गीयांचा सरकारी नोकऱ्यांमधील प्रलंबित बॅकलॉग तातडीने भरणे, असे महत्त्वाचे ठराव एकमताने मंजूर करण्यात आले. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना दर्जेदार शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणे, सामाजिक *(पान २ वर)*

# सोलगव्हाण-घोडेगावातील ११५ भाविक महाराष्ट्र दर्शनासाठी रवाना

**विरेगाव - प्रतिनिधी**



जालना तालुक्यातील सोलगव्हाण व घोडेगाव येथील ११५ भाविक महाराष्ट्र दर्शनाच्या यात्रेसाठी शनिवारी सायंकाळी रवाना झाले. या यात्रेत प्रामुख्याने ६५ वर्षांवरील ज्येष्ठ भाविकांचा सहभाग असून, पंढरपूर, तुळजापूर, वैद्यनाथ (परळी), औंढा नागनाथ यांसह राज्यातील विविध धार्मिक व तीर्थक्षेत्रांना भाविक भेट देणार आहेत.

ज्येष्ठ नागरिकांना विविध धार्मिक स्थळांचे दर्शन घेता यावे तसेच त्यांना आध्यात्मिक समाधान मिळावे, या उद्देशाने या यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.

सामाजिक कार्यकर्त्यांच्या पुढाकारातून भाविकांसाठी बसची व्यवस्था करण्यात आली. त्यामुळे अनेक वर्षांपासून धार्मिक स्थळांना भेट देण्याची इच्छा असलेल्या ज्येष्ठ भाविकांना एकत्रितपणे आणि सोयीस्कररीत्या तीर्थक्षेत्रांचे दर्शन घेण्याची संधी मिळाली आहे. शनिवारी सायंकाळी भाविक यात्रेसाठी रवाना होत असताना गावकऱ्यांच्या वतीने त्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. यावेळी भाविकांना सुखरूप, आनंददायी व मंगलमय यात्रेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. गावातील ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने यात्रेत सहभागी झाल्याने परिसरात उत्साहाचे वातावरण होते.

**बसची व्यवस्था झाल्याने ज्येष्ठांनाही सहज दर्शन'**

यात्रेसाठी रवाना होणारे ६५ वर्षीय रोहिदास शेवाळे म्हणाले, ''आम्ही गेली कित्येक वर्षे पंढरपूरला वारीला जात होतो. आता सामाजिक कार्यकर्त्यांनी बसची व्यवस्था केल्याने वृद्धांनाही सहज दर्शन घेता येणार आहे. अनेक तीर्थक्षेत्रांना भेट देता येणार असल्याने खूप आनंद होत आहे.

ज्येष्ठ भाविकांना एकत्रितपणे तीर्थयात्रेची संधी मिळाल्याने त्यांनी या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.